# मुंबई विद्यापीठ

**क्र.आरईजी/आयसीडी/२०२०-२१/२८**

**परिपत्रक :-**

मुंबई शहर व मुंबई उपनगरे या परिसरातील मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक व मान्यताप्राप्त संस्था यांना असे कळविण्यात येते की, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.६ /विशि-३, दिनांक ३ फेब्रुवारी, २०२१ परिपत्रकानुसार महाविद्यालये/संस्था यांनी स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्याशी विचारविनिमय करून महाविद्यालये / संस्था सुरू कराव्यात असे कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने दिनांक १२ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सूचनांनुसार तूर्तास विद्यापीठ शैक्षणिक विभाग व महाविद्यालये / संस्थांचे नियमित वर्ग सुरू करू नयेत असे आदेश प्राप्त झालेले आहेत.

त्या अनुषंगाने शासन परिपत्रकानुसार दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजी विद्यापीठ शैक्षणिक विभाग, महाविद्यालये / संस्थांचे नियमित वर्ग सुरू करण्याचे योजले होते ते आता बृहन्मुंबई महानगरपालिका परिपत्रक क्र. सहआयुक्त शिक्षण /१६९५/ दिनांक १२.०२.२०२१ नुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालये /संस्थेतील नियमित वर्ग सुरू करण्यासंबंधी २२ फेब्रुवारी २०२१ पूर्वी कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मुंबई – ४०० ०३२
१२ फेब्रुवारी, २०२१

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

प्रति,

मुंबई शहर व मुंबई उपनगरे या परिसरातील मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक व मान्यताप्राप्त संस्था

प्रत माहितीसाठी रवाना

स्वीय सहाय्यक (१) मा. कुलगुरू (२) मा, प्र-कुलगुरू (३) मा. कुलसचिव (४) मा. वित्त व लेखा अधिकारी (५) संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

क्र. सह आयुक्त शिक्षण/ 1695 दि.12/02/2021

प्रति,
डॉ. बळीराम गायकवाड (प्रभारी कुलसचिव)
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट परिसर,
मुंबई – 400 032.

विषय: बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महविद्यालये / संस्थेतील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत.

संदर्भ: 1. महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे दिनांक 29 ऑक्टोबर, 2020 रोजीचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -2020 / प्र. क्र. 86 / एसडी-6.

2. महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे दिनांक 10 नोव्हेंबर 2020 रोजीचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -2020 / प्र. क्र. 140.

3. क्र. महाराष्ट्र शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे दिनांक 18 जानेवारी, 2020 रोजीचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -2020 / प्र. क्र. 204 / एसडी-6

4. क्र. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दिनांक 03 फेब्रुवारी, 2021 रोजीचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -2021 / प्र. क्र.6/ विशि -3.

5. मुंबई विद्यापीठाचे क्र. आरईजी/आयसीडी/2020-21/167 दि. 04.02.2021 पत्र.

उपरोक्त संदर्भ क्रमांक 4 नुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महविद्यालये / संस्थेतील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दिनांक 03 फेब्रुवारी, 2021 रोजीचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -2021 / प्र. क्र.6/ विशि – 3 मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, स्वयंअर्थसहय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महविद्यालयातील नियमित वर्ग जागेची उपलब्धता पाहून, 50% पर्यंत विद्यार्थ्यांना रोटेशन पद्धतीने दि. 15 फेब्रुवारी, 2021 पासून वर्गात प्रवेश देण्याबाबत सदर परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आली आहे.

तसेच राज्यातील प्रतिबंधित प्रक्षेत्रातील विद्यापीठे व संलग्नित महविद्यालये ही ज्या आयुक्त, महानगरपालिका / नगरपालिका किंवा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे अंतर्गत येत असल्यामुळे त्यांच्याशी संबंधित विद्यापीठाने संबंधित स्थानिक प्रधिकरणाशी विचारवनिमय करुन कोव्हीड -19 च्या आजाराचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी विचारात घेऊन विद्यापीठे व महाविद्यालये सुरु करण्याबाबत आपल्या स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करुन सूचना निर्गमित करण्याबाबत नमूद केले आहे.

त्याअनुषंगाने, आपणांस कळविण्यात येते की, मुंबईमध्ये दि. 01.02.2021 पासून लोकल सेवा सुरु करण्यात आली आहे व त्यानुसार कोरोनाच्या रुग्णांच्या संख्येतील वाढ / घट याबाबतचे येत्या आठवडयात सर्वेक्षण करुन बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महविद्यालये / संस्थेतील नियमित वर्ग सुरु करावे किंवा कसे याबाबत आपणांस दि. 22 फेब्रुवारी, 2021 पूर्वी कळविण्यात येईल.

आपल्या माहितीकरिता व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

12/2

(श्री. रमेश पवार)
सह. आयुक्त शिक्षण

Scanned with CamScanner